सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज तात-१ १७८ ठ. क्र. १८६ दि. २७/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-१/१७८

प्र.क्र. ११ देशमुख पाटील वस्ती अर्जुन कॅन्टीन ते शिवाजी मंदिर शेवटपर्यंत रस्ता करणे कामाचे प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करणेत आलेले पूर्वगणनपत्रक क्र. - सन २०१६-१७ र.रु. १९,९९,७०४/- यांस मा. स्थापत्य समितीची सक्षम मान्यता मिळून मा. म.न.पा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३१-७-१६ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २०९, दिनांक १९-८-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~आमुली~~/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १५८ ठ. क्र. १८८ दि. १८/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

अहमदनगर जिल्हयातील ता. कर्जत कोपर्डी या गावी कु. श्रध्दा सुद्रीक या बालिकेवर अमानुष बलत्कार करुन सदर मुलीचा निर्घुण खून करण्यात आला. सदरची घटना ही अत्यंत क्रुर व मानवतेला काळीमा फासणारी आहे. सदर गुन्हयाचा तपास शिघ्रगतीने करुन सदरची केस फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना कडक शिक्षा करणेस ही सभा राज्य सरकारला शिफारस करीत आहे व पिडीत कुटूंबास सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने १ लाख रुपये (एक लाख रुपये) आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~वामुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १६० ठ. क्र. १८८
दि. २५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



**१)** देगाव जुना कडगुंठा म्हणून ओळखल्या जाणा-या परिसरास **देवतारानगर** असे नामकरण करणेस **२)** देगाव जुना मुल्ला वस्ती म्हणून ओळखल्या जाणा-या परिसरात तेथे असलेल्या सोलापूरातील अष्टविनायकपैकी चौथा गणपतीची मूर्ती असून, त्यानुसार सदर भागास **गणेशनगर** असे नामकरण करणेस **३)** देगाव जुना पारशेट्टीवस्ती म्हणून ओळखल्या जाणा-या परिसरास **योगेश्वरनगर** असे नामकरण करणेस **४)** देगाव सोलापूर मंगळवेढा रोडवरील उजव्याबाजूकडील जुना कोठेवस्ती म्हणून ओळखल्या जाणा-या परिसरास **श्रीरामनगर** असे नामकरण करणेस त्याप्रमाणे नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान कमिटीकडे निर्णयास्तव पाठविण्यात येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १६१ ठ. क्र. १८९
दि. १७/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा, महानगर सोलापूर यांना शहरातील कलावंताना विविध नाटकांमध्ये व महोत्सवामध्ये भाग घेऊन नाटक सादर करणेस्तव नाटकाच्या तालमीसाठी हॉलची अत्यंत आवश्यकता असून त्यांना हुतात्मा स्मृती मंदिर परिसरातील , थिएटर मागील गेट शेजारील तालीम हॉल २९ वर्षे ११ महिन्याचे मुदतीने रु.१ अशा नाममात्र भाड्याने देण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६२ ठ. क्र. १६०
दि.२५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. २९ मध्ये नगरोत्थान मध्ये मंजूर झालेल्या १८ मिटरचा रस्ता तयार करण्यासाठी जागा उपलब्ध होणेसाठी जी कांही घरे पूर्णपणे बाधीत झालेली आहेत किंवा अर्धे बाधीत झालेली आहेत किंवा अंशतः बाधीत झालेली आहेत. असे वरीलप्रमाणे टक्केवारी असलेल्या बाधीत घरांच्या घरमालकांना त्यांना महानगरपालिकेकडून सर्व्हे करुन त्यांच्या नांवावर इतर ठिकाणी अजिबात घर नसलेल्या पूर्ण बाधीत झालेल्या घरमालकांना महानगरपालिकेचे उपलब्ध असलेल्या व बांधून तयार असलेल्या पंतप्रधान आवास योजने अंतर्गत व इतर कांही योजने मधील उपलब्ध तयार असलेल्या झोपडपट्टीधारकांना जी घरे बांधलेली आहेत. त्या घरापैकी रिकामी असलेल्या घरामध्ये सेटलमेंट येथील बाधीत झालेल्या घरांच्या मालकांना त्यांच्या सोयीसाठी तयार असलेली घरे राहणेसाठी द्यावीत किंवा महानगरपालिकेच्या उपलब्ध असलेल्या रिकाम्या जागेत त्यांना घर बांधण्यासाठी जागा देणेत यावे.

जर तेथील बाधीत झालेल्या लोकांना हा प्रस्ताव मान्य नसेल तर त्यांना जर सेटलमेंटलगत रिकामी जागा पाहिजे असेल तर सेटलमेंट मधील ब्रिटीशकालीन चर्चच्या पश्चिमेकडील बाजूस असलेली सलगरवाडी पर्यंतची जी रिकमी जागा असेल तर त्या रिकाम्या जागेत घरजागा देण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.१६४..ठ. क्र....१९१
दि..१७/१०/१६...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सौ. इंदू अर्जुन नवगिरे राहणार गौतम नगर बुध्दमंदिर जवळ सोलापूर यांच्या डाव्या पायाच्या गुडग्यास फॅक्चर होऊन त्यांचे ऑपरेशन झाले आहे. सदर ऑपरेशनसाठी त्यांना खूप मोठा खर्च सोसावा लागला. सौ. इंदू अर्जुन नवगिरे यांची घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखीची असून त्यांचे पती सध्या बेकार आहेत. तरी सोलापूर महानगरपालिकेतर्फे त्यांना जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.१६५ ठ. क्र.१९२ दि.१८/१०/१६ रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ३१ मधील **१)** श्री. दयानंद जाधव घरापासून ते उर्दू डी.एड. कॉलेजपर्यंतच्या रस्त्यास थोर सामाजिक कार्यकर्ते **कै. महिबूब विजापूरे मार्ग** असे नामकरण करणे **२)** रामवाडी रिक्षा स्टॉप ते श्री गणपती मंदिरापर्यंतच्या रस्त्यास **कै. जोगीसिध्दा जाधव** असे नामकरण करणे **३)** श्री. कासिम शेख यांचे घरापासून ते श्री. कतनाळे यांच्या घरापर्यंतच्या रस्त्यास **कै. लक्ष्मण भोसले** असे नामकरण करणे **४)** श्री. रहिमान नदाफ यांच्या घरापासून ते रामवाडी पोलीस चौकीपर्यंतच्या रस्त्यास **कै. हबीबसाब सय्यद** असे नामकरण करणेस, सदर ठिकाणी नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज१६६ ठ. क्र.१९३
दि.१५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील प्र.क्र.३१ मधील राहणारे सौ.मनिषा गायकवाड रा.रामवाडी, त्यांनी शल्य चिकित्सा या आजाराने ग्रस्त असुन, डॉ.काळे पॅथोलॉजी लॅबोरेटरी येथे उपचार घेतला असून, त्यांना रुपये सत्तर हजार इतका खर्च झाला आहे. त्यांची घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची व गरीबीची असुन, त्यांना सोलापूर महानगरपालिकेकडुन जास्तीत-जास्त आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६७ ठ. क्र. ९९४
दि. १५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सालाबादप्रमाणे श्रावणी समाप्तीनिमित्त, शेळगी गणपती कामेश्वर समस्त भक्त मंडळातर्फे यंदाही (अक्कीपूजा) अक्षता पूजा आयोजित केले आहे. गुरुवार दिनांक १-९-२०१६ रोजी रात्रौ १२.०० नंतर, मुर्ती रुद्राभिषेक व अथर्वशिष्य दाम्पत्य पूजा होईल. तसेच शुक्रवार दिनांक २-९-२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता महाआरतीचा कार्यक्रम आहे. त्यानिमित्त जवळपास तीन ते चार हजार भक्तजणांना महाप्रसाद (जेवण) दिले जात असते. तरी सदर कार्यक्रमास सोलापूर महानगरपालिकेतर्फे भरीव आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १७० ठ. क्र. १९५ दि. १५/१०/१६ रोजी ठेवला असता प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील श्री.सुभाष तुकाराम वैकुंटे रा.१८१ शुक्रवार पेठ सोलापूर येथे राहत असून, त्यांना एकच मुलगी आहे. तेही लग्न होऊन सासरी गेलेली आहे. त्यांना ह्दयविकाराचे आजार असून त्यांना तीन ब्लॉकेजेस आहेत. त्यांच्यावर शस्त्रक्रिया करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांच्या घरी कमावते कोणी नसल्याने त्यांच्या कुटुंबास उदरनिर्वाहसाठी मनपाच्या वतीने जास्तीत-जास्त आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका